# 2.3 मराठी

## (द्वितीय भाषा)

**प्रास्ताविक**

मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा आहे. भारतातील प्रगत भाषांपैकी मराठी ही एक भाषा आहे. विविध प्रांतातील अनेक अमराठी भाषिक लोक महाराष्ट्रात राहतात. त्यांची मातृभाषा जरी वेगळी असली तरी हे लोक महाराष्ट्रात राहत असल्यामुळे त्यांना दैनंदिन व्यवहार चालविण्यासाठी मराठी भाषा अवगत होणे अनिवार्य आहे. त्यामुळे त्यांनी मराठी भाषा शिकण्याची अत्यंत आवश्यकता आहे. त्यांच्यामध्ये मराठी भाषेबद्दल आपुलकी, प्रेम व जिव्हाळा निर्माण व्हावा, महाराष्ट्रातील लोकजीवन, परंपरा यांच्याशी एकरूपता निर्माण व्हावी, तसेच मराठी साहित्याची प्रातिनिधिक स्वरूपात ओळख व्हावी हाही द्वितीय भाषेचा आणखी एक हेतू आहे.

**उद्दिष्टे**

१) विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे आकलन होऊन ती सहजपणे बोलता, वाचता आणि लिहिता येणे.

२) मराठी भाषेतील शब्दसंग्रह वाढून त्याचे उपयोजन कौशल्य विकसित होणे.

३) योग्य उच्चार व योग्य स्वराघात यांचा मेळ साधून प्रकट वाचन करता येणे.

४) लेखनाच्या नियमांचा योग्य उपयोग करून लिहिता येणे.

५) मराठीतील विविध साहित्य प्रकारांचा आस्वाद घेता येणे व साहित्यिकांचा परिचय होणे.

६) राष्ट्रीय एकात्मता, विश्वबंधुत्व, विज्ञाननिष्ठा, सर्वधर्मसमभाव, स्त्री-पुरुष समानता, नैतिक मूल्ये, निसर्गप्रेम, श्रमप्रतिष्ठा आणि सामाजिक जाणीव इ. गुणांची वाढ व जोपासना करणे.

७) भाषेचा दैनंदिन व्यवहारात उपयोग करता यावा या दृष्टीने व्यावहारिक भाषेत प्रावीण्य मिळवून देणे.

८) चित्रपट, आकाशवाणी, दूरदर्शन, संगणक, ई-मेल, मोबाइल इ. दृक्-श्राव्य साधनांच्या द्वारे भाषिक अनुभव वाढविणे.

**इयत्ता ९ वी**

**गद्य पाठ** : **एकूण ५५ पृष्ठे**
(प्रस्तावना, टीपा, स्वाध्याय वगळून)

**पद्य पाठ** : एकूण ओळी- १००

**स्थूल वाचन** : सुमारे १५ पृष्ठे.

**व्याकरण** : वाक्प्रचार, वाक्यात उपयोग करा
लेखननियमांनुसार शब्दांची दुरुस्ती, सामान्य रूप
विभक्ती आणि प्रत्यय ( फक्त परिचय गुण नाहीत)
समानार्थी/विरुद्धार्थी शब्द देणे

**लेखन** : अ) निबंधलेखन (मुद्यांच्या आधारे)
वर्णनात्मक १ विषय, कल्पनात्मक १ विषय
(चरित्र/आत्मचरित्र हे प्रकार वगळण्यात आले आहेत )
आ) गोष्ट/कथालेखन (मुद्यांवरून गोष्ट)
इ) उतारा आकलन (अपठित उताऱ्यावर तीन प्रश्न देणे)

**उपयोजित (व्यावहारिक)** : अ) पत्रलेखन
१) औपचारिक पत्र
आ) वृत्तलेखन /जाहिरात

■ **<u>महत्त्वपूर्ण :</u> इस प्रारूप के आवश्कयतानुसार परिवर्तन करने का अधिकार 'मंडल' के 'हिंदी अध्ययन मंडल' को रहेगा!**

**संवादकौशल्ये**

**इयत्ता १० वी**

**गद्य पाठ** : सुमारे ५५ पृष्ठे
(प्रस्तावना, टीपा, स्वाध्याय इ. वगळून)

**पद्य** : सुमारे १०० ओळी

**स्थूल वाचन** : सुमारे १५ पृष्ठे

**व्याकरण** : १) समास, द्विगू, द्वंद्व (तीन उपप्रकारांसह- समाहार, वैकल्पिक, इतरेतर))

२) वाक्यप्रकार- प्रश्नार्थक, आज्ञार्थक, उद्गारवाचक, विधानार्थी

३) लेखननियमांनुसार शब्द लिहिणे

४) वाक्प्रचार

**लेखन** : अ) निबंध (दिलेल्या मुद्द्यांचे आधारे)
वर्णनात्मक १, कल्पनाप्रधान १, वैचारिक १

आ) गोष्ट/कथालेखन - (मुद्द्यांवरून)

इ) उतारा आकलन (अपठित उताऱ्यावर तीन प्रश्न देणे)

**उपयोजित (व्यावहारिक) लेखन** : अ) पत्रलेखन - व्यावसायिक

आ) वृत्तलेखन (बातमी लेखन) / जाहिरात

**संवादकौशल्ये** : तोंडी परीक्षा